# मी जशी आहे, तशी सुंदर आहे!

*प्रिय सखी,*

तू जशी आहेस तशी सुंदर आहेस. जगाला तुझा जो काळा रंग, तुझं जाड शरीर, चेहऱ्यावरचे फोड आवडत नाहीत, त्या प्रत्येक गोष्टीसहित तू खूप सुंदर आहेस. सौंदर्याचं आकर्षण जसं तुला वाटतं तसं प्रत्येकालाच असतं. प्रत्येकालाच वाटतं की आपण जगाने तयार केलेल्या त्या सुंदरतेच्या चौकटीत बसावं.



**मग सौंदर्य म्हणजे नक्की काय?**
**ती जगाची चौकट कोणती?**

या जगाने सौंदर्याची एक चौकट बनवून त्यात स्त्रियांना कैद केलं आहे. म्हणूनच "दिसायला कशीये ती . . . नुसती काळीकुट्ट!", "शरीर बघा कसं फुगलयं नुसतं!", "प्रत्येक पुरुषाला गोरीच बायको हवी असते!", "गोऱ्या मुलींनाच फक्त नाचण्याच्या स्पर्धेत घेतले जाईल." अशी वाक्यं आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. कारण समाजात गोरी, सडपातळ, लाजरी-बुजरी, सजली-सवरलेली स्त्रीच सुंदर समजली जाते. तिचं बाह्य सौंदर्य हेच तिच्या सुंदर असण्याचं मापदंड मानलं जातं.

**काळं असणं वाईट नाही,**
**गोरं असणं वरदान नाही!**
*शरीरातील मेलानिनच्या प्रमाणानुसार त्वचेचा रंग ठरतो.*

**सौंदर्याची व्याख्या सांगणाऱ्या फसव्या, खोटारड्या जाहिराती पण आपल्याला हेच सांगत असतात.** चांगली नोकरी हवी? गोरी हो. प्रमोशन हवं? गोरी हो. कॉलेजमध्ये मित्र हवेत? गोरी हो. आत्मविश्वास हवा? गोरी हो. एकंदरीत मुलीला तिच्या बुद्धिमत्तेने जे जे मिळवता येईल, ते तसं न मिळवता गोऱ्या रंगाने मिळेल हेच या फसव्या जाहिराती सांगत असतात. कुठल्याही चित्रपटात / जाहिरातीत एखादी नटी काळी का नसते? . . . "ये काली काली आँखें . . . ये गोरे गोरे गाल . . ." हेच ऐकत आपण लहानाचे मोठे झालो. ही प्रसारमाध्यमं आपल्या मनावर सुंदरतेची खोटारडी व्याख्या ठसवत आहेत. हे फक्त रंगाविषयीच नाही बरं का! तर मुलींचं वजन किती असावं, छाती किती हवी, पोट कसं सपाटच हवं, केस कसे असावे हे पण या जाहिराती सांगत असतात. कारण या कंपन्यांना त्यांचा सौंदर्यप्रसाधनांचा धंदा जोरात चालवायचा आहे.

सुंदरतेच्या या खोट्या व्याख्येतून मग आपल्यात एक न्यूनगंड निर्माण होतो. निराशा येते. क्षमता, कौशल्य असूनही अनेक मुली आत्मविश्वास गमावून बसतात. या सगळ्यातून येणारं नैराश्यही भयंकर असतं. आपल्यात काहीतरी कमी आहे असं या ह्या खोटारड्या जाहिराती सतत आपल्यावर बिंबवत असतात. आज सौंदर्याच्या या साचेबद्ध चौकटीमध्ये आपल्याला अडकवलं जात आहे, शोभेची बाहुली बनवलं जात आहे, आपली विचारशक्ती नाहीशी केली जात आहे.




*म्हणूनच समाजाने लादलेली सौंदर्याची ही चौकट आता नाकारायला हवी. आता बास झालं! दुसऱ्याच्या नजरेतून स्वतःकडे पाहणं थांबवून आपल्याला शरीरापलीकडे जाऊन पाहण्याची नवी नजर जगाला द्यायला हवी. आपल्या वागण्यात सौंदर्य आहे, बोलण्यात सौंदर्य आहे, आत्मविश्वासात सौंदर्य आहे, स्वावलंबनात सौंदर्य आहे. स्वतःचे निर्णय स्वत: घेण्यात सौंदर्य आहे. हे आता आपण जगाला ठणकावून सांगायलाच हवं. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आपण प्रत्येकीने स्वतःच्या शरीरावर, स्वतःवर प्रेम करत जगायला हवं.*

**चला, जगाला स्त्रियांकडे पाहण्याची नवी दृष्टी देऊया . . .**

सखींनो, स्त्रियांकडे पाहण्याची ही अन्यायकारक दृष्टी काही फक्त सौंदर्यापुरतीच नाही. तर समाजात आजही स्त्रियांकडे दुय्यम नागरिक म्हणूनच पाहिलं जातं. सर्वच पातळ्यांवर स्त्रियांसोबत भेदभाव, अन्याय होताना दिसतो. हा अन्याय दूर होऊन स्त्री- पुरुष समानता यावी असं आम्हाला वाटतं. म्हणूनच दीडशे वर्षांपूर्वी स्त्री-पुरुष समतेसाठी लढणाऱ्या महात्मा फुले व सावित्रीबाई फुलेंचा वारसा घेऊन, आम्ही गेल्या काही वर्षांपासून 'अभिव्यक्ती' संघटनेतर्फे ह्या सर्व प्रश्नांवर संघटितपणे काम करत आहोत. आम्ही पण तुमच्यासारख्याच सर्वसामान्य मुली आहोत. यात तुम्हीही आमच्याबरोबर या! त्यासाठी आमच्या खालील पत्त्यावर संपर्क करा.

***एकीनं एक एक, निर्भीड साऱ्या बना गं!***

---


**संपर्क पत्ता:** अभिव्यक्ती, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळ स्टॉपजवळ, पुणे – ४.
या पत्त्यावर दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सकाळी ९ – १२ या वेळेत महिलांची बैठक होते.
अलका – ९४२२३१९१२९, अजित – ९४२३५८६३३०

**अभिव्यक्ती**

pune.abhivyakti@gmail.com www.lokayat.org.in abhivyakti.pune


---


हे पत्रक अलका जोशी यांनी अभिव्यक्तीकरिता शुक्रवार, दि. ११ ऑगस्ट २०१७ रोजी पुणे येथे प्रकाशित केले.